350

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/१२२१ दिनांक : २० नोव्हेंबर,२००० 

**परिपत्रक क्र. ५३**

**विषय** : निविदा पूर्व अर्हता ठरविताना ठेकेदाराच्या कंपनीचे ''निव्वळ आर्थिक मूल्य''(Net Worth) विचारात घेणेबाबत.

**संदर्भ** : दि.४ मार्च,१९९९ चे पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/ ३५०/६३८.(परिपत्रक क्र.१४)

बृहत आराखडयानुसार राबविण्यात येणाऱ्या कामांची समयबध्द अंमलबजावणी होण्याचे अनुषंगाने रु.२५ कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या निविदांसाठी आर्थिक दृष्टया सक्षम असणारा कंत्राटदारच अर्हतापात्र ठरावा व कामे नियोजित वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी विशिष्ठ कामाच्या अनुभवाबरोबरच कंत्राटदाराचे 'निव्वळ आर्थिक मूल्य ' विचारात घेवून कंत्राटदारांना पूर्वअर्हता देण्यात यावी अशा सूचना संदर्भीय परिपत्रकाव्दारे देण्यात आलेल्या होत्या. तथापि, याबाबत असे निदर्शनास येत आहे की, मोठे कंत्राटदार कामे स्वत:च्या नावाने घेतात व ही कामे स्वत: न करता इतरांना 'सबलेट' करतात व याचा कामाच्या नियोजनावर विपरित परिणाम होवून त्याचे उत्तरदायित्व मात्र प्राधिकरणावर येत आहे. तसेच या अटीमुळे काही ठराविक ठेकेदारच अर्हताप्राप्त ठरत आहेत. त्यामुळे संदर्भीय परिपत्रकातील सूचनांचा पुनर्विचार करणे प्राधिकरणाच्या विचाराधीन होते.

या अनुषंगाने दि.१० ऑक्टोबर,२००० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ८८ व्या बैठकीमध्ये कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आली होती. या कार्यक्रम बाबीमध्ये उद्घृत करण्यात आलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली व घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आपणास खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

....२....

दि.४ मार्च,१९९९ च्या परिपत्रकातील सूचना रद्द करण्यात येत आहेत, त्याऐवजी यापुढे खालील अटींचा अंर्तभाव निविदासूचनेमध्ये करण्यात यावा.

''प्राधिकरणाकडून बोलविण्यात येणाऱ्या ज्या निविदांची किंमत रु.२५ कोटी वा त्यापेक्षा जास्त आहे अशा सर्व नागरी/ ग्रामीण पाणी पुरवठा व मलनि:सारण कामांसाठी कंत्राटदाराचे निव्वळ आर्थिक मूल्य तपासताना चार्टर्ड अकाउंटंटकडून प्रमाणित करण्यात आलेल्या आर्थिक ताळेबंदानुसार सदर ठेकेदार घेवू इच्छित असलेले काम ज्या आर्थिक वर्षात येते त्या वर्षीच्या आधीच्या सलग ३ वर्षाचे सरासरी आर्थिक मूल्य निविदेतील कामाच्या किंमतीच्या किमान ८% असणे आवश्यक आहे.''

कंत्राटदाराची पूर्वअर्हता ठरविताना वरील सुधारित सूचनेचे काटेकोरपणे पालन व्हावे.

राजेंद्र सगणे

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव(तांत्रिक)

प्रत : मा.मंत्री,ग्राम विकास ,पाणी पुरवठा व स्वच्छता ,मंत्रालय,मुंबई,यांचे माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,मंत्रालय,मुंबई,यांचे माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री,नगर विकास,मंत्रालय,मुंबई,यांचे माहितीसाठी सादर.
प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई,यांचे माहितीसाठी सादर.
सदस्य सचिव(प्रशासन व बाहय अर्थसहाय्य),म.जी.प्रा.,मुंबई,यांचे माहितीसाठी.
प्रधान महालेखाकार(लेखा परिक्षा)१,महाराष्ट्र,१०१ महर्षी कर्वे रोड,चर्चगेट,यांचे माहितीसाठी.
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,नवी मुंबई,यांचे माहितीसाठी.
सर्व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई,यांचे माहितीसाठी.
सर्व अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.मंडळ,यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.बांधकाम विभाग,यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

M. J. P.
ISSUED
21 NOV 2000
MUMBAI-21